


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

।। यः क्रियावान् स पण्डितः ।।

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. संजयकुमार एन. दळवी
एम.एस्सी., पीएच.डी.
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र.: विकमं/२०१४–१५/५८१ दिनांक : ११/११/२०१४.

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

विषय :– संविधान दिन साजरा करणेबाबत...
संदर्भ क्र. :– महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. जपुती २२०८/१३३८/ प्र.क्र. १०९/०८/२९, दि. २४ नोव्हेंबर, २००८

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव यांचेमार्फत दि. २६ नोव्हेंबर 'संविधान दिन' साजरा करणेबाबत कळविण्यात आले आहे. दि. २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व सर्व पदव्युत्तर विभागांत वरील संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे 'संविधान दिन' साजरा करण्याबाबत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/पदव्युत्तर विभागात संविधान दिन कार्यक्रमाबाबत आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

सदर कार्यवाहीचा अहवाल यांना महाराष्ट्र शासनास पाठविणे आवश्यक असल्यामुळे वरीलप्रमाणे आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल **सोमवार, दि. ०१ डिसेंबर, २०१४ पर्यंत** मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ या कार्यालयास पाठविण्यात यावा, ही विनंती.

कळावे,

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


**विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११००७.**
**☎ ०२०–२५६०११६०, ६५००३७००/०१ फॅक्स : ०२०–२५६०११५४ मो.: ९८५००१४४६६**

**भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करीता राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक, संपुती २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२४ नोव्हेंबर, २००८

**प्रस्तावना :-**

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य व समानता प्राप्त करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्य घटना अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वतःप्रत अर्पण केलेली आहे. सदर राज्य घटना ही दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अंमलात आली तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही देशाच्या बहुतेक नागरिकांना तसेच संविधानानुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनाही नाही. त्यामुळे या संविधानाने शासकिय, न्यायीक इत्यादी सारख्या यंत्रणा निर्माण झाल्या त्या संविधानाची ओळख सर्वांना करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" साजरा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-**

याप्रकरणी शासनाने साकल्याने विचार करुन राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती व्हावी यादृष्टिने दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणून राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये, पुढीलप्रमाणे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) (परिशिष्ट-१ पहावे) सामुहिक वाचन करण्यात यावे.

२) संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा, महाविद्यालयामार्फत त्या दिवशी "संविधान यात्रा" काढण्यात यावी व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संविधानातील महत्त्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) याबाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४) शासकिय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत इत्यादी.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, उपरोक्त कार्यक्रम साजरा करण्याकरीता येणारा खर्च संबंधीत प्रशासकिय विभागाने/कार्यालयाने हा त्यांच्या कार्यालयीन खर्चातून किंवा अशाच तऱ्हेच्या उद्दिष्टांसाठी असलेल्या तरतूदीतून भागवावा.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात वरील प्रमाणे "संविधान दिवस" साजरा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य शासनास दिनांक ८ डिसेंबर पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

टी. एफ. थेक्केकरा

(टी.एफ.थेक्केकरा)
शासनाच्या प्रधान सचिव.

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वियं सहाय्यक
मा. मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई,
मा.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर व औरंगाबाद खंडपिठ.
सर्व मा. अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई,
मा. कुलपती, राज्यातील सर्व विद्यापिठे.
प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, राज्य माहिती आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, राज्य मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग (सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठविण्याच्या विनंतीसह).
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासाठी)
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी (सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या विभागातील/जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठविण्याच्या विनंतीसह).
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व आयुक्त महानगर पालिका
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
सार्वजनिक बांधकाम विभाग, (प्रशा- ४ ) मंत्रालय मुंबई
निवड नस्ती.